# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

बांधकाम विभाग

प्रस्तावना :-

**विषय :- भिवंडी नि.श.महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क्रं.१ अंतर्गत वॉर्ड क्रं.२ मिल्लतनगर येथील आरक्षण क्रं.४९ येथील उदयान विकसित करणे.(अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम सन २०२१-२२)**

भिवंडी नि.श.महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क्रं.१ अंतर्गत वॉर्ड क्रं.२ मिल्लतनगर येथील आरक्षण क्रं.४९ येथील उदयान विकसित करणेकामी रु. १,९९,७६,४७७/- मात्रच्या प्रस्तावास मा.जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांचेकडील प्रशासकीय मान्यतेचा आदेश जा.क्रं. सामान्य/नवि./टे.-२/अल्पसंख्यांक/भिनिशमनपा/प्र.मा./कावि./६६७/२०२२ दिनांक ०१/०६/२०२२ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळालेली आहे. सदर कामाची रक्कम रु.१,९९,७६,४७७/- मात्रची फेर ई निविदा सुचना क्रं.१५७/२०२२-२३ (१ कामं) दै.नवभारत टाईम्स, महाराष्ट्र टाईम्स या वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या www mahatenders.gov.in देवुन या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची ई-निविदा मागविणेत आली असता सदर कामासाठी एकुण पात्र १ निविदेत मे.बुबेरे ॲण्ड असोसिएटस, भिवंडी यांनी दिलेला देकार न्युनतम असुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.१५० टक्के कमी दराने म्हणजेच रक्कम रु. १,९५,४६,९८२/- येत आहे.

मे.बुबेरे ॲण्ड असोसिएटस, भिवंडी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.१५० टक्के कमी दराने रक्कम रु. १,९५,४६,९८२/- (अक्षरी रु.एक कोटी पंच्यांनव्वद लाख शेचाळीस हजार नऊशे ब्याऐंशी मात्र) च्या खर्चाची निविदा संविदा करणेकामीच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त आधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारसीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक २२/०२/२०२३ रोजी पूर्वमान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासक मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्रं.:- 909 दिनांक :- २६ /०२/२०२३

भिवंडी नि.श.महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क्रं.१ अंतर्गत वॉर्ड क्रं.२ मिल्लतनगर येथील आरक्षण क्रं.४९ येथील उदयान विकसित करणेकामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे.बुबेरे ॲण्ड असोसिएटस, भिवंडी, यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.१५० टक्के कमी दराने रक्कम रु. १,९५,४६,९८२/- (अक्षरी रु.एक कोटी पंच्यांनव्वद लाख शेचाळीस हजार नऊशे ब्याऐंशी मात्र) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त आधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारसीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधील तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी नि.श.महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क्रं.१ अंतर्गत वॉर्ड क्रं.२ मिल्लतनगर येथील आरक्षण क्रं.४९ येथील उदयान विकसित करणेकामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे.बुबेरे ॲण्ड असोसिएटस, भिवंडी यांचे सोबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३(क) अन्वये संविदा करण्यास प्रशासकीय मंजुरी देत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)

**प्रशासक,**

भिवंडी नि.श.महानगरपालिका